संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# सव्वीस अकरा आणि अजूनही सुरक्षिततेचे तीन तेरा

सहा वर्षांनंतरही दहशतवादाविरुध्द आपण यशस्वीपणे मुकाबला करू शकलो नाही. २६/११ ही तारीख मुंबईकरांच्या मनावर इतकी कोरली गेली आहे की आजही त्याच्या आठवणी जागवल्या तर शहारे येतात. त्याचवेळी सरकारी निष्क्रियतेबाबत संतापही वाटतो. आज ज्यावेळेला या हल्ल्यानंतर सरकारने सुरक्षिततेचे काय उपाय योजले आहेत.असा आढावा घेतला तर सरकारला दहशतवाद संपवायचा नाही असे चित्र पहायला मिळते. २६/११ चा हल्ला आणि त्याचे परिणाम आपल्या सत्ताधाऱ्यांनी आणि सरकारी यंत्रणांनी अजूनही लक्षात घेतलेले नाहीव. ज्याला आपण दहशतवादी हल्ला म्हणतो ते भारताच्या आर्थिक राजधानीत घुसून पाकिस्तानने लढलेले युध्द होते. इतकी त्याची गंभीरता मोठी असताना अजूनही सुरक्षा यंत्रणांची अक्षम्य हेळसांड सुरू आहे. आजही उपाययोजनांबाबत शंभर टक्के सुधारणा झालेली नाही.या हल्ल्यामध्ये ज्या कारणांमुळे निष्पाप लोकांचे बळी गेले, ज्यामुळे दहशतवादी थेट मुंबईमध्ये घुसून दहशतीचा थरार निर्माण करून गेले. ही कारणे माहीत झाली असूनही उपाययोजना मात्र अजूनही झालेल्या नाहीत. आजही मुंबईच्या कोणत्याही चौपाटीच्या माध्यमातून दहशतवादी पुन्हा घुसू शकतात. आजही घुसलेले दहशतवादी बेछूट गोळीबार करून अनेकांचे बळी घेऊ शकतात. कारण गेल्याच आठवड्यात नौदलाने प्रामुख्याने पश्चिम किनारपट्टीवर बंदोबस्तासाठी लागणाऱ्या आधुनिक सामुग्रीचा पाढा वाचून दाखवला. नव्या संरक्षण मंत्र्यांना त्यांच्याकडे नसलेल्या साधनसामुग्रींची यादीच बहाल केली आहे. त्या साधनांमध्ये दहशतवादाशी मुकाबला करणे म्हणजे समोरच्या शत्रूला पुन्हा आमंत्रण देण्यासारखेच म्हणावे लागेल.मुंबई पोलिसांना आवश्यक असलेली लाईफ जॅकेट सहा वर्षांनंतरही मिळू शकलेली नाहीत. कारण काय की ही जाकिटं पुरवणाऱ्या कंपन्यांचे टेंडर्स कोणी मंजूर करायचे याची कार्यपध्दतीच सरकार ठरवू शकलेले नाही. याला सरकारने नवे शस्त्रधोरण असे नाव दिले. ते सहा वर्षांनंतरही नक्की झालेले नाही. किनारपट्टीवर आवश्यक असलेल्या स्पीड बोटी आजही चांगल्या परिस्थितीमध्ये नाहीत. हा हल्ला झाल्यानंतर मोठ्या तावातावाने केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने शहरभर सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील अशी घोषणा केली होती. परंतु आज मुंबईत काही मोक्याची ठिकाणे सोडली तर सीसीटीव्ही कॅमेरे लावले गेलेले नाहीत. अशा पध्दतीचे सुरक्षिततेचे धिंडवडे काढले जात आहेत. दहशतवादाशी लढणे तर सोडाच परंतु सामान्य माणसाच्या जीविताचे रक्षण करण्याचे पुरुषार्थ आपले सत्ताधारी दाखवू शकलेले नाहीत.

### मुंबईची गर्दी आणि अपुरे पोलीस

आज ज्यावेळेला न्यायालयाने स्वत:हून या संदर्भातली जनहित याचिका दाखल करून घेतली त्यावेळेला सरकारी पातळीवरचा निर्लज्जतेचा किती कहर झालेला आहे हे लक्षात आले.तब्बल अडीचशे तीनशे लोकांचे बळी या हल्ल्यामध्ये गेले. तीन दिवस सगळी मुंबई भीतीच्या सावटाखाली होती. चार कार्यक्षम अधिकारी आणि पोलीस शिपाई या लढ्यामध्ये हुतात्मा झाले. स्वतंत्र भारताच्या इतिहासात एखाद्या शहरावर अशा प्रकारचा मोठा हल्ला होण्याचा तो पहिलाच प्रकार होता. सुरक्षिततेचा विचार करताना ज्या साध्या साध्या गोष्टींची पूर्तता करायली हवी तीदेखील सरकार करू शकलेले नाही. मुंबई ही सव्वा कोटी लोकसंख्या असलेली महानगरी आहे. या तुलनेमध्ये पोलिसांची संख्या किती, त्यांच्याकडे साधनसामुग्री किती आणि या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारकडे उपाययोजना कोणती या तीनच मुद्यांची जरी चिरफाड केली तरी यापुढे होणाऱ्या दहशतवादी हल्ल्याला त्या दहशतवाद्यांपेक्षाही सरकार जास्त जबाबदार राहील असे आज चित्र आहे. म्हणजे आम्हाला दहशतवाद्यांनाही रोखायचे नाही आणि सामान्य नागरिकांचे प्राणही वाचवायचे नाहीत. चार वर्षे या कसाबला पोसण्यात सरकारने सव्वा कोटी रुपये खर्च केले. परंतु आज मुंबईत सव्वा कोटीचे सीसीटीव्ही कॅमेरेही लागलेले नाहीत. त्या कसाबला फासावर चढवायलासुध्दा चार वर्षे वाट पहावी लागली. ही तर त्याची वानगीदाखल उदाहरणे आहेत. पण आज ज्या गर्दीचा आम्ही विशेषत्वाने उल्लेख करतो ती मुंबईची सामाजिक आणि भौगोलिक परिस्थिती बघितली तर मुंबई हे दहशतवादासाठी कसे सॉफ्ट टार्गेट आहे हे सिध्द होते. कोणत्याही उपनगरीय रेल्वे स्थानकावर रोज लाखो प्रवासी ये-जा करतात. पण या ठिकाणी सुसज्ज असे दहा पोलीससुध्दा तुम्हाला सापडणार नाहीत. पोलिसांच्या नुसत्या उपस्थितीने गर्दी नियंत्रणात राहते आणि समाजकंटकांना थारा मिळत नाही. ही अतिशय साधी उपायोजनादेखील होऊ शकलेली नाही.आणि मग हीच गर्दी दहशतवाद्यांना हल्ले करण्यासाठी वरदान ठरू शकते. याचे भान सरकारला नाही.

### बोलण्याचेही धाडस नाही

सुरक्षितता असो किंवा या हल्ल्यामागे असलेल्या या आरोपींना पकडण्याबाबतची मोहीम असो.सगळ्या पातळीवर अत्यंत ढिसाळ कारभार चालू असल्याचे दिसून येते. या हल्ल्यामागे जे आरोपी आहेत त्यांना त्यांनी हवाली करावे. अशी वारंवार मागणी केली गेली. पण पाकिस्तानने त्याला कवडीची किंमत दिलेली नाही. आतादेखील नेपाळमध्ये सार्क राष्ट्रांच्या परिषदेत नरेंद्र मोदींनी नवाझ शरीफ यांच्या उपस्थितीत आपल्या प्रमुख भाषणात २६/११ च्या हल्ल्याचा उल्लेख केला. परंतु हे आरोपी भारताच्या हवाली करावे, हे उघडपणे सांगण्याचे धाडस ते करू शकलेले नाहीत. कदाचित अशी मागणी करणे त्यांना संयुक्तिक वाटले नसेल. परंतु जेव्हा मोदी या राष्ट्रांच्या शेजारधर्माविषयी बोलतात त्या वेळी आपल्या देशावर सतत भिरभिरणाऱ्या या संकटाचा उल्लेख करणे अनिवार्य ठरते. दाऊद काय किंवा हफीज काय हे दोन्ही अतिरेकी पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये लपलेले आहेत. त्यांना खेचून आणणे हादेखील दहशतवादाविरुध्दची आंतरराष्ट्रीय स्तरावरची आवश्यकता ठरते. याचा अर्थ सर्वच आघाड्यांवर या संकटाचा मुकाबला करण्याकरता सरकारने ठोस उपाय योजलेले नाहीत. हे पुन्हा एकदा सहा वर्षांनंतर सिध्द झालेले आहे.